Shivaji College Hingoli Dist Hingoli

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380

ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE, 2021, VOL- 10, ISSUE-56

## Special Issue of Department of Library, Lokmanya Mahavidyalaya Warora, Dist. Chandrapur

On

# USE OF INFORMATION TECHNOLOGY IN LIBRARY SERVICES

**Chief Editor**

Dr. Subodh Kumar Singh
Principal

**Editor**

Smt. Leena N. Puppalwar
Librarian

**Associate Editor**

Dr. Jayshree P. Shastri (Head, Marathi Dept.)
Dr. Shrinivas N. Pilgulwar (Head, Sociology Dept.)
Prof. Tanaji S. Mane (Head, Pol. Sc. Dept.)
Dr. Dipak P. Lonkar (Head, History Dept.)
Prof. Uttam R. Deulkar (Director, Phy. Ed. Dept.)
Dr. Ravindra Bapurao Shende (Head, Department of Economics)
Prof. Shrikant N. Puri (Head, English Dept.)

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

Shivaji College Hingoli
Dist. Hingoli


| | | |
|---|---|---|
| 36 | **USE OF ICT IN LIBRARY SERVICES DURING COVID-19 PANDEMIC**<br>*Shekhar G. Dixit & Vrushabh S. Dahake* | 177-182 |
| 37 | **USE OF ICT TOOLS - SOCIAL MEDIA TO PROMOTE LIBRARY SERVICES**<br>*Mr. Dinesh T. Sakhare* | 183-186 |
| 38 | **USE OF INFORMATION AND COMMUNICATION TECHNOLOGY IN THE LIBRARY SERVICES**<br>*Mahendra shantaram sable* | 187-189 |
| 39 | **USE OF INFORMATION TECHNOLOGY IN LIBRARY SCIENCE IN THE PRESENT ERA**<br>*Tanuja* | 190-193 |
| 40 | **USE OF INFORMATION TECHNOLOGY IN LIBRARY SERVICES**<br>*Dr. Vibhavari B. Hate* | 194-195 |
| 41 | **USE OF THE HYBRID APP IN THE LIBRARY**<br>*Shrikant Rokade* | 196-201 |
| 42 | **WEB CONTENT ANALYSIS OF C.P.E. COLLEGE LIBRARY WEBSITES OF MARATHWADA REGION: A COMPARATIVE STUDY**<br>*Mr. Sonule Rahul Changdeo & Dr. S. G. Kshirsagar* | 202-208 |
| 43 | **ग्रंथालयात हरित माहिती संप्रेषण तंत्रज्ञानाचा वापर**<br>*Mrs. Asha Chandrashok Jirage* | 209-214 |
| 44 | इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयातील वाचन साहित्याचे व्यवस्थापन<br>*डॉ. पवार जी.आर.* | 215-222 |
| 45 | **COVID-19 आणि माहिती तंत्रज्ञान आधारित ग्रंथालय सेवा**<br>*सौ. पाटोळे सिता प्रकाश* | 223-227 |
| 46 | माहिती तंत्रज्ञान आणि महाविद्यालय ग्रंथालयात आधुनिक माहितीसेवांची उपयुक्तता<br>*डॉ. रेखा ताराचंद झलके* | 228-236 |
| 47 | मोबाईल तंत्रज्ञान व क्लाऊड कम्प्युटीगचे वाढते महत्व<br>*प्रा. अनिल चहांदे & प्रा. डॉ. वर्षा अ. तिडके (शनीवारे)* | 237-240 |
| 48 | डिजिटल ग्रंथालय : आजची गरज<br>*हिना आ. बावस्कर* | 241-245 |


PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

Assistant Professor,
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

Shivaji College Hingoli Dist. Hingoli



## इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयातील वाचन साहित्याचे व्यवस्थापन

**डॉ. पवार जी. आर.**

*शिवाजी महाविद्यालय हिंगोली, ganpatpawar3@gmail.com*

**सार**

*प्रस्तुत शोध निंबधामध्ये ई—वाचन साहित्य संग्रहाचा विकास आणि त्याचे व्यवस्थापन, इलेक्ट्रॉनिक संसाधने,तसेच ई—संसाधनाची ग्रंथालयातील गरज,ई—संसाधनाबाबत धोरण ठतवताना लक्षात घ्यावयाच्या बाबी,ग्रंथालयातील इलेक्ट्रॉनिक संसाधनांचे व्यवस्थापन आणि इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाच्या व्यवस्थापनाचे घटक इ.बाबत विवेचन करण्यात आले आहे.*

***शोध संज्ञा*** *वाचन साहित्य संग्रह विकास,वाचन साहित्य संग्रहाचे व्यवस्थापन, इलेक्ट्रॉनिक माहिती,ई—संसाधने,ई—ग्रंथालय ई—जर्नल्स.*

**प्रस्तावना** तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील विकासाचा ग्रंथालयाच्या एकुण अस्तित्वावर सेवावर परीणाम होत आहे. आज ग्रंथालयामध्ये संगणकाच्या सहाय्याने माहितीचे संग्रहण वितरण आणि प्रथःकरण अतिशय वेगाने केले जात आहे.ज्ञान व माहितीच्या परिस्फोटाच्या या युगामध्ये काळानुरूप चालविण्यासाठी ग्रंथालयामध्ये संगणकाचा वापर अपरिहार्य ठरत आहे. इलेक्ट्रॉनिक माध्यमाचा उपयोग संगणकामुळे फारच झपटयाने वाढत आहे. त्यातच जागेची समस्याही जागतिक बनत चालली आहे.माहितीचे प्रसारणही वेगाने होणे व ती माहिती वाचकांना, संशोधकांना त्वरीत उपलब्ध करुन देणे ही हया वेगवान जगामध्ये गरजेचे ठरले आहे. हया सर्वावर उपाय म्हणुन इलेक्ट्रॉनिक व डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रसार झपाटयाने होत आहे. त्वरीत उपलब्ध होणारी सेवा,क्षणभरात आंतरराष्ट्रीय स्तरावरुन मिळणारे ज्ञान व माहिती,अल्पावधीत साधता येणारा संपर्क,झटपट खरेदीची उपलब्धता अशा अनेक सोयीमुळे ग्रंथालयातील इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानाची वाढती मागणी आहे.

पुस्तके आणि वाचक हे मुलतः ग्रंथालयाचे दोन घटक आहेत.आणि माहितीसाठी हा त्या ग्रंथालयाचा गाभा असतो. आधुनिक काळात ई— पुस्तके,ई —जर्नल्स इत्यादीच्या रुपातुन माहिती आधुनिक ग्रंथालयातुन मिळते.आजच्या बहुतांश ग्रंथालय सेवा या संगणकामार्फत दिल्या जातात.यामुळे जगामध्ये कोणत्याही कानाकोपऱ्यात उपलब्ध असलेली माहिती आपल्याला काही सेंकदात मिळु शकते.

### वाचन साहित्य संग्रह विकास

इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयातील सर्व वाचन साहित्या हे संगणकीय स्वरुपात असते.तसेच ग्रंथालयातील सर्व व्यवहार हे इलेक्ट्रॉनिक माध्यमाद्वारे केले जातात.सर्व वाचन साहित्य हे अभासी स्वरुपात असतात.

इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयासाठी ई—वाचन साहित्याची निवड करुन ते उपार्जित करण्याची प्रक्रिया म्हणजे वाचन साहित्य संग्रहाचा विकास करणे होय.

PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

67

Shivaji College Hingoli Dist Hingoli



३) इंटरनेटच्या आधारे डाऊनलोड केलेले सी.डी.स्वरुपातील वाचन साहित्य.
४) इंटरनेटवरील ऑनलाईन उपलब्ध साहित्य.
५) इलेक्ट्रॉनिक माध्यमातुन प्रकाशित होणारे पुढील ई–संसाधने आहेत.
६) ई –पुस्तके, ई –जर्नल्स, ऑनलाईन इंटरनेट ॲक्सेस,सी.डी.रॉम डेटाबेस.
७) कनसोर्सियाच्या माध्यमातुन मिळणारे ई–बुक्स,ई–जर्नल्स अथवा इतर साहित्य.
८) माहिती सहकार समान उदिष्टये असणाऱ्या संस्थानी एकत्र येऊन आपआपसात केलेली माहिती बाबतची भागीदारी.

**ई–पुस्तके (e-books)** इलेक्ट्रॉनिक माध्यमातुन प्रकाशित होणाऱ्या साहित्यामध्ये आणि जास्तीत जास्त वापर होणारे साधन म्हणजे ई–पुस्तक आहे.आज संगणक तंत्रज्ञानात अभियांत्रीकी इत्यादी बऱ्याच विषयावरील ई–पुस्तक वाचकासाठी इलेक्ट्रॉनिक स्वरुपामध्ये उपलब्ध आहेत.तसेच या पुस्तकांचा मोठया प्रमाणवरील संग्रह सी.डी. स्वरुपामध्ये अथवा संगणकीय जाळयामार्फत संपुर्ण जगामध्ये प्रसारीत करण्यात आली आहे.

**ई–जर्नल** आजकाल बहुतांशी आंतरराष्ट्रीय दर्जाची नियतकालिकेच्या स्वरुपात उपलब्ध होत आहेत.छापील नियतकालिकांच्या अंकाना 'हार्डकॉपी' व त्याचेच इलेक्ट्रॉनिक स्वरुप म्हणजे ' सॉफ्टकॉपी' अशा संज्ञा प्रचलित आहेत.ई– जर्नलसच्या प्रकाशनाने नियतकालिका प्रकाशनात क्रांती घडवून आणली.त्यामुळे नियतकालिका प्रकाशन व त्यांच्या उपलब्धतेमध्ये आमुलाग्र बदल झाला.ई –जर्नल्स प्रकाशन हे इंटरनेटच्या माध्यमातून प्रकाशीत झाल्यावर तात्काळ उपलब्ध होते.हे या क्रांतीमधले मोठे यश म्हणावे लागेल.नियतकालिकांची सॉफ्टकॉपी उपलब्ध होत असेल तर ती ग्रंथालयात उपलब्ध करण्यासाठी वाचकांची मोठी मागणी असते. किंबहुना छापील,तसेच इलेक्ट्रॉनिक या दोन्ही स्वरुपात ते उपलब्ध व्हावे अशीही त्यांची इच्छा असते.

जागेट हे केवळ ई–जर्नल्स संबंधी उपयुक्त पोर्टल असुन या पोर्टलद्वारे जगातील आंतरराष्ट्रीय दर्जाच्या ५४१५ प्रकाशकाची प्रकाशीत केलेल्या १५७८२ ई–जर्नल्स मधील ८६३११३७ एवढया प्रलेखाची माहिती ऑनलाईन दिली जाते.या जेगेटचाही ग्रंथालयाने आपल्या वाचकांना माहिती देण्यासाठी उपयोग करुन घेतला पाहिजे.

ई–जर्नल्सच्या वापरावर मालकी हक्काच्या कायद्याचे नियंत्रण असते.या कायद्याच्या चौकटीत ई–स्त्रोत ग्रंथालयात वापरण्यासंबंधीची माहिती ग्रंथालयान आपल्या कर्मचाऱ्याना, तसेच वाचकांना करुन देणे अत्यंत आवश्यक आहे.

**सी.डी.रॉम** सी.डी.रॉमचे पुर्ण नांव कॉम्पॅक्ट डिस्क रिड ओन्ली मेमरी असे होय. सी.डी.रॉम पध्दतीच्या डिस्कमध्ये सी.डी. ऑडीओ,सी.डी. व्हीडीओ तसेच सी.डी. इंन्टरॲक्टीव म्हणजेच सी.डी.आय.असे प्रकार आहेत. माहिती साठवणूकीच्या दृष्टीने व ग्रंथालयात सध्या बराच प्रचलीत असा प्रकार म्हणजे सी.डी.आय.,सी.डी.रॉमची साठवण क्षमता ६६० मेगा बाईट इतकी असते.सी.डी.माध्यमाद्वारे नियतकालिकामधुन वेगवेगळया विषयावर प्रसिध्द होणाऱ्या लेखांची सूचीबध्द माहिती डाटाबेस स्वरुपात ग्रंथालयात उपलब्ध होत आहे.



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

68

Shivaji College Hingoli Dist Hingoli



इलेक्ट्रॉनिक संसाधनांची केवळ एकदा खरेदी करून भागेल असे नाही तर ती माहिती वापरण्यासाठी, पाहण्यासाठी लागणारे उपयुक्त तंत्रज्ञान तसेच ती माहिती विशिष्ट कालावधीनंतर अद्यावत करून घेणे गरजेचे असते. त्यासाठी ग्रंथपालांना आर्थिक अंदाजपत्रक वेळोवेळी बदलून योग्य तरतुद करावी लागते.

**२. उत्पादनाचा दर्जा**

ग्रंथालयात ग्रंथ व अमुद्रीत ग्रंथेत्तर साहित्य खरेदी करतांना त्या साहित्याचा दर्जा पाहणे गरजेचे असते. तसेच इलेक्ट्रॉनिक संसाधनांचा खरेदी करतांना त्यांच्या दर्जा पाहुणच खरेदी केले पाहिजे. आजकाल सर्वांनाच अतिशय जलद माहिती हवी असते. आणि इंटरनेट सर्वात वेगवान माध्यम असल्यामुळे त्याकडे सर्वांचा ओढा असतो. बऱ्यात इंटरनेटववर उपलब्ध असणारी माहिती सुध्दा तंतोतंत खरी आहे त्याबाबत कोणीही खात्री देऊ शकत नाही.

**३. तंत्रज्ञानाची कालबाहयता**

तंत्रज्ञानातील उत्क्रांतीचा हा एक परिणाम आहे की ज्यामुळे नवीन तंत्रज्ञान विकसित झाल्यावर जुन तंत्रज्ञान फारसे हार्डवेअर मध्ये वेळोवेळी बदल होत आहेत. नवनविन आज्ञावली अस्तीत्वात येत आहेत त्यामुळे आपला संगणक सतत अद्यावत करणे गरजेचे आहे.

**४. अधिकार करार**

बरेचसे प्रकाशक इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असलेली माहिती देताना काही करार करतात. ते पाळणे गरजेचे असते. असे उत्पादन खरेदी करण्यापूर्वी त्या कराराविषयी अभ्यास करणे आवश्यक आहे.

**५. स्वामित्व हक्क**

आंतरराष्ट्रीय ठरावानुसार बौध्दिक हक्कामध्ये कॉपीराईट व महत्वाचा असुन लेखकाने प्रकाशित केलेल्या तारखेपासून व हयैतीनंतर ६० वर्ष अशा अधिकारांचा अंत असतो. या कालावधीनंतर असे पुस्तक सार्वजनिक वापरासाठी मुक्त होते. अंकीय रूपांतरासाठी अशी ग्रंथसंपदाच फक्त विचारात घेता येते किंवा पूर्वपरवानगीसह ग्रंथाचा विचार करता येतो. इलेक्ट्रॉनिक प्रकाशनामध्ये दिवसेंदिवस अतिशय वेगाने बदल होत आहेत. सध्या अस्तित्वात असलेल्या स्वामित्व हक्क कायद्यांच्या चौकटीत कसे बसवता येतील हे अद्याप अस्पष्ट आहे. शैक्षणिक व संशेधनात्मक कार्यासी काही माहिती वापरली जाण्यास हरकत नाही परंतु काही ग्रंथालये विनाकरण यावर बंधने घालतात.

**६. मानवी संसाधन**

ग्रंथालयातील कर्मचाऱ्यांना अद्यावत तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे तसेच नवनविन कौशल्यांचा स्वत:मध्ये विकास करून घेण्यासाठी प्रवृत्त करणे गरजेचे आहे.

**७. माहितीचे स्थलांनंतर**

तंत्रज्ञानाच्या कालबाहयतेमुळे एखाद्या जुन्या प्रणालीवरील असलेली माहिती काही वेळा नष्ट होण्याचा धोका असतो. त्यावर उपाय म्हणून सतत काही विशिष्ट कालावधीनंतर माहितीचे स्थलांतर अद्यावत अशा तांत्रिक प्रणालीमध्ये करून घेणे गरजेचे असते.



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

69

Shivaji College Hingoli Dist Hingoli



**३. संग्रहण**

अंकीय स्वरूपातील माहिती संसाधने ही प्रक्रिया तसेच सतत उपयोगात आणले जाणारे साहित्य असल्यामुळे त्यांचे संग्रहण अतिशय काळजीपुर्वक करणे आवश्यक असते जर असे नाही झाले, तर त्या संसाधनाचा ही वाचन साहित्य संसाधन वेळोवेळी अद्यावत करून घेणे आवश्यक आहे. तसेच ही संसाधने नियमितपणे वापरली गेली पाहिजेत तसेच सीडी यान वापरल्या गेल्यास साडेतीन वर्षाच्या कालावधीनंतर त्यावरील समाविष्ट माहिती नष्ट होण्याची भिती असते.

**४. माहिती प्रसार आणि पुन:प्राप्ती**

माहिती ही छापील किंवा अंकीय स्वरूपामध्ये उपलब्ध आहे. आंकीय स्वरूपातील माहिती संसाधनातील माहिती ही इलेक्ट्रॉनिक उपकरणांद्वारे इच्छित स्थळी पोहचविली जाते. या पध्दतीमध्ये माध्यमे व त्यांना जोडणारे दुवे अतिशय महत्वाचे ठरतात. माहिती पुन:प्राप्ती पध्दती ही वाचक व उपलब्ध माहिती साधने यामधील दुवा म्हणुन कार्य करते. अनिश्चितता टाळण्यासाठी ज्ञान व ज्ञानासाठी माहिती मिळविणे आवश्यक आहे. म्हणुन सैध्दांतिक स्वरूपातील माहिती प्रसारीत होणे गरजेचे आहे. कोणत्याही संकिय माहिती केंद्राचे कार्य पुढील दोन गोष्टींवर अवलंबुन असते.

१. विषयमुल्यांनुसार माहितीची रचना करणे.
२. वाचकांना अद्ययावत प्रकाशित साहित्याविषयी माहिती देणे माहितीच्या प्रसारणामुळे वाचकांना त्यांच्याशी संबंधित विषयामध्ये अद्यावत माहिती मिळणे.

**सारांश**

अशाप्रकारे ग्रंथालयातील वाचन साहित्य संग्रहाचा विकास ही एक संस्थेची ध्येय, व्याप्ती, उद्दिष्टे आणि कार्यक्रम यांच्या आधारावर नियोजीत केलेली निर्णय प्रक्रिया असुन इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयातील वाचन साहित्य व्यवस्थापन करताना भविष्य काळातील तंत्रज्ञानाच्या विकासाचा वेध घेणे अत्यंत आवश्यक आहे. आपण असमर्थ ठरलो तर त्या ग्रंथालयाचा विकास खुंटला असेच म्हणावे लागेल. कारण इलेक्ट्रॉनिक माध्यमे,इंटरनेट सेवा ई.माध्यमातून आपण माहितीच्या महाजालात प्रवेश करीत असतो.त्यातील आवश्यक माहिती डाऊनलोड करुन साठवून ठेवली जाते व आवश्यक तेव्हा ती वापरली जाते.वाचकांना अधिक चांगल्याप्रकारे सेवा देता यावी यासाठी इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयातील वाचनसाहित्य अधिक उपयोगी पडते. म्हणूनच इलेक्ट्रॉनिक वाचनसाहित्य संग्रह विकासाकडे गांभीर्यान पाहिले पाहिजे.तरच ग्रंथालयाचा विकास होतो व विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या माध्यमातुन मिळणारी माहिती ही अतीशय उपयुक्त ठरेल.

**संदर्भ सूची**

*कुंभार, राजेंद्र. (२०००). महाविद्यालयीन व विद्यापीठीय ग्रंथालये नाशिक.*
*फडके, द.ना. (२००७). ग्रंथालय संगणकीकरन आणि आधुनिकीकरण, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.*
*नरगुंदे, रेवती. (२०१३). ग्रंथालय आणि सामाजिक विकास, पुणे : युनिव्हर्सल प्रकाशन.*



PRINCIPAL
Shivaji College
Hingoli.Dist.Hingoli

70